# प्रकरण सहावे

## शिक्षण व सहकार क्षेत्रातील राजारामबापू पाटील यांचे कार्य --

## प्रकरण - सहावे

## मा.राजारामबापू पाटील - शिक्षण व सहकार क्षेत्रातील कार्य --

मा.श्री.राजारामबापू पाटील यांच्या शैक्षणिक कार्याचा विचार करीत असताना शिक्षण मिळविण्यासाठी मा.बापूंनी केलेली खडतर वाटचाल लक्षात घेणे जरुरीचे आहे. त्या काळामध्ये कासेगांवामध्ये मराठी सहावीपर्यन्तच शिक्षण उपलब्ध होते. इयत्ता सातवीच्या शिक्षणासाठी मा.बापूंना नेर्ले या गावी पाच किलोमिटर जावे लागले.कासेगांव ते नेर्ले हे जाण्यायेण्याचे दहा किलोमिटरचे अंतर मा.बापू पायी चालत जात असत. या खडतर वाटचालीत कासेगांव शिक्षण संस्थेच्या स्थापनेची बीजे रोवली गेली आहेत. प्राथमिक शिक्षणानंतर माध्यमिक शिक्षणासाठी मा.बापू पुण्याला गेले,त्यांना बडोद्याच्या सयाजीराव गायकवाड महाराजांनी मराठा शिष्यवृत्ती दिली म्हणूनच ते माध्यमिक व महाविद्यालयीन शिक्षण पूर्ण करु शकले. महाविद्यालयीन शिक्षण त्यांनी बडोदा येथे पूर्ण केले. व एल.एल.बी.साठी ते कोल्हापूर ला साईक्स लॉ कॉलेजमध्ये आले.एल.एल.बी.होत असतानाच्या काळात त्यांचा संपर्क कासेगांवचे क्रांतिकारक बाबुजी पाटणकर व धन्वतरी दादा यांच्याशी झाला. या काळात ते भूमिगत होते व त्यांच्या मनात शिक्षण संस्था काढण्याचे विचार होते.त्यांनी हा विचार मा.बापूंना बोलून दाखविला व संस्थेची जबाबदारी स्वीकारण्याची विनंती केली.मा.बापू नुकतेच एलएल.बी.झालेले होते .वकिली पत्करुन स्वत:चा उत्कर्ष करुन घ्यावयाचा की जबाबदारीचे जोखड स्वीकारायचे हा प्रश्न त्यांच्या समोर उभा राहिला पण शिक्षणाची सुविधा नसल्यामुळे बहुजन समाज शिक्षणापासून वंचित आहे व आपल्याला जे शिक्षण घेताना कष्ट सोसावे लागले ते कासेगांवातील आपल्या बांधवाना सोसावे लागू नयेत या उदात्त हेतूने त्यांनी वकिली न पत्करता कासेगांव शिक्षण संस्था स्थापन्याची जबाबदारी स्वत:कडे घेतली.[१]

## सन १९४५ मध्ये मा.बापूना कायद्याची पदवी --

मा.राजारामबापू पाटील सन १९४५ मध्ये कोल्हापूर येथील लॉ कॉलेजमधून कायद्याची पदवी घेऊन बाहेर पडले. आणि त्यानंतरच त्यांनी सार्वजनिक जीवनाला ख-या अर्थाने सुरुवात केली. हा कालखंड स्वातंत्र्याच्या लढयातील शेवटच्या टप्प्यातील होता. भारताला लवकरच स्वातंत्र्य मिळणार हे स्पष्ट दिसू लागले होते. स्वातंत्र्य मिळाल्यानंतर देशासमोर आव्हानाचे स्वरुप स्वाभाविकच बदलणार होते,स्वातंत्र्य लढयाच्या काळातील देशासमोरील मुख्य आव्हान स्वातंत्र्यासाठी त्याग करणे,तुरुंगवास पत्करणे हे होते परंतु स्वातंत्र्यानंतरच्या काळातील मुख्य आव्हान देशाच्या सर्वांगीण विकासाचे होते. मा.श्री.राजाराम-बापू पाटील यांनी बदलत्या काळाच्या या प्रेरणा अचूकपणे ओळखल्या आणि ते लगेच विकासाच्या कामाकडे वळले.[२]

## कासेगाव शिक्षण संस्थेची स्थापना ( १९४५ )

मा.श्री.राजारामबापू पाटील यांनी आपल्या सार्वजनिक जीवनाची सुरुवातच शैक्षणिक अर्थाने केली.ही घटना त्यांच्या जीवनातील मूलभुत प्रेरणेच्या दृष्टीने अतिशय बोलकी आहे.मा.बापूंनी कासेगांव येथे कासेगांव शिक्षण संस्था स्थापन केली. मा.बापूंचे शिक्षण हे खेडेगांवच झाले होते.त्यामुळे त्यांना खेड्यातील शिक्षणातील उणिवा,अडचणी त्यांनी अनुभवल्या होत्या.खेड्यांचा विकास करण्यासाठी पहिल्यादा तेथील लोकांना सुशिक्षित बनविले पाहिजे व त्यासाठी तेथील लोकांना शिक्षणाची सोय उपलब्ध व्हायला पाहिजे असे त्याचे स्पष्ट मत होते म्हणून ते म्हणतात''शिक्षणाची गंगा झोपडीपर्यन्त पोचली पाहिजे' त्याकरिता त्यांनी शिक्षण संस्थेची स्थापना खेडेगावातच केली.[३]

## कासेगांव येथे आझाद विद्यालयाची स्थापना ( १९४५ )

सन १९४५ मध्ये कासेगांव शिक्षण संस्थेची स्थापना केल्यानंतर लगेच मा.बापूंनी कासेगांव येथे या संस्थेद्वारे आझाद विद्यालय सुरु केले व त्या विद्यालयामध्ये विनावेतन शिक्षकाचे काम सुरु केले व संस्थेचा खर्च चालविण्यासाठी लोकांच्या खळ्यावर पोते घेऊन मा.बापूंनी धान्य गोळा केले. मुलांना चांगल्या

पध्दतीचे शिक्षण मिळावे यासाठी आपले कॉलेज मित्र श्री गोपाळराव उफळेकर ,श्री.दत्तोबा घोरपडे यांना विनंती करुन कासेगांवमधील आझाद विद्यालयात आणले हे कार्य करीत असताना आर्थिक झळ सोसलीच पण शारीरिक कष्टही उपसले.संताच्या शिकवणीचा संयम व शिक्षणाची दग उरामध्ये घेऊनच मा.बापूंची त्या काळातील वाटचाल होती. या शिक्षण संस्थेचे काम करीत असताना त्यावेळी (१९४५ ) पुज्य साने गुरुजी यांनी कासेगांवला भेट दिली होती व बापूंच्या या कार्याला आर्शिवाद दिला होता. आर्शिवाद देत असताना पूज्य साने गुरुजींनी म्हटले होते की 'हा धडपडणारा मुलगा राजाराम पाटील,देशाचा महान पुढारी होईल.' पूज्य साने गुरुजीचा आर्शिवाद पुढे खरा ठरलेला आहे. याचवेळी आझादीची चळवळ सुरु असल्याने त्यांनी कासेगांवच्या विद्यालयाला आझाद विद्यालय हे नांव दिले होते.[४]

कासेगांव येथे सर्वोदय वसतिगृहाची स्थापना ( १९४५ )

कासेगांव शिक्षण संस्थेच्या स्थापनेनंतर मा.बापूंनी आझाद विद्यालय सुरु केले. परंतु ते शिक्षण सर्व उपेक्षित गोर गरीब मुलांना मिळावे त्यांच्या राहण्याची व जेवनाची मोफत सोय व्हावी यासाठी व उपेक्षित समाज शिक्षणापासून वंचित होऊ नये म्हणून त्यांनी सन १९४५ मध्ये सर्वोदय वसतिगृहाची स्थापना केली. त्यावेळी विनोबा भावे यांची सर्वोदय चळवळ सुरु होती. म्हणून त्या वसतिगृहास सर्वोदय वसतिगृह असे नांव देण्यात आले. या वसतिगृहामध्ये अनेक गावची मुले येत असत.जवळ जवळ ४०० ते ५०० मुलांची व्यवस्था या वसतिगृहामध्ये करण्यात आली होती.[५]

न्यु इंग्लीश स्कूल - पेठ ( १९५७ )

मा.राजारामबापू पाटील कासेगांव शिक्षण संस्थेचा विस्तार करीत असताना प्रामुख्याने खेडेगांवाना प्रोत्साहन दिले होते. त्याप्रमाणे त्यांना पेठ चे कार्यकर्ते श्री मदू पेढकर यांनी विनंती करुन आमच्या गावामध्ये हायस्कूल काढावे असे सूचविल्याबरोबर मा.बापूंनी पेठेला न्यू इंग्लिश स्कूल,पेठ येथे हायस्कूल काढून तेथील मुला-मुलींना शिक्षणाची दारे खुली करुन दिली.६

वाटेगांव हायस्कूल ,वाटेगांव (१९५९ )

कासेगांव पासून १० किलोमिटर अंतराहून लांब असणा-या वाटेगांव या गावातून मुला-मुलींना उन्हा-पावसामध्ये शिक्षणासाठी पायी चालत कासेगांव येथील आझाद विद्यालयामध्ये यावे लागत असे त्यावेळी एस.टी.ची सोय उपलब्ध नसल्याने मुला-मुलींना फार त्रास होत असे हा त्रास दूर करण्यासाठी मा.बापूंनी वाटेगांव ता.वाळवा या खेडेगांवामध्ये वाटेगांव हायस्कूल सुरु करुन मुला-मुलींच्या शिक्षणाची सोय उपलब्ध करुन दिली.[७]

शिवाजी हायस्कूल ,बावची ( १९६१ ) -

सन १९६१ मध्ये मा.राजारामबापू पाटील यांनी वाळवा तालुक्यातील बावची या खेडेगांवामध्ये हायस्कूल सुरु केले.बावची येथील हायस्कूलला छत्रपती शिवाजी महाराजांचे नांव देण्यात येते होते. ज्यापध्दतीने अनेक कटू प्रसंग कर्मवीर माऊराव पाटील यांना आले,तसेच अनुभव मा.बापूंना देखिल बावची हायस्कूल सुरु करतेवेळी आले. मा.बापूंनी शिवाजी महाराजांचे नांव त्या हायस्कूलला दिले. आज शिवाजी हायस्कूल ,बावची एक नावाजलेले ज्ञानकेन्द्र असलेले दिसून येते.[८]

यशवंत हायस्कूलची इस्लामपूर येथे उभारणी ( १९६१ )

सन १९६१ मध्ये मा.राजारामबापू पाटील यांनी यशवंत हायस्कूल , इस्लामपूर येथे सुरु केले. त्यावेळचे धडाडीचे व महाराष्ट्राचे शिल्पकार मा.ना. श्री यशवंतराव चव्हाण यांचे नांव हायस्कूलला देण्यात आले त्यावेळी इस्लामपूर मधील कार्यकर्त्यांसमोर व शिक्षकांच्या समोर त्यांनी मोलाचे विचार मांडले.

आपले विचार व्यक्त करीत असताना मा.बापू म्हणतात' आपण किती माध्यमिक विद्यालये काढली,आपल्या संस्थेच्या किती संख्यात्मक विस्तार झाला याला महत्व नाही.आपण वेगवेगळ्या शाखांच्या माध्यमातून किती गुणात्मक वाढ केली,किती विद्यार्थ्यांना घडविले याला महत्व आहे.छ.शिवाजी महाराजांना, स्वामी विवेकानंदाना,लोकमान्य टिळकांना,देशभक्त बाबू गेनू या सर्वांना घडविणारे शिक्षकच होते .माझे शिक्षक लोकांना एकच सांगणे आहे की,

तुम्ही घेतलेला वसा ,तुम्ही हाती घेतलेले काम हे कारखान्यात तयार होणाऱ्या यंत्रासारखे नाही,आम्ही तुम्हा शिक्षकांच्या हातामध्ये असंख्य मातीचे गोळे दिले आहेत या मातीच्या गोळ्याला आकार देण्याचे तुमचे काम आहे हे काम दादोजी कोंडदेव आणि मातोश्री जिजाबाईनी यशस्वीरित्या केले आहे. तसेच हे काम गांधीजी आणि भगतसिंग यांच्या शिक्षकांनी जीव ओतून केलेले आहे,तेच आणि तशाच प्रकारचे काम तुम्हाला करायचे आहे हे कधीही विसरु नका.[९]

केवळ स्टेजवर मा.फुले,आंबेडकरांच्या नावाची जपमाळ ओढायची आणि कृती मात्र तशी करायची नाही, हा राजकीय दुटप्पीपणा मा.बापूंच्याजवळ नव्हता. 'बोले तैसा चाले ' या तुकाराम महाराजांच्या अभंगातील ओळीप्रमाणे कृती करण्यामध्ये मा.बापू कधीही मागे राहिले नाहीत.[१०]

आर्टस,कॉमर्स कॉलेज,आष्टा (१९६५ ) ची स्थापना --

सन १९६५ च्या वेळी ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना महाविद्यालयीन शिक्षण घेण्यासाठी सांगली किंवा वारणानगर सारख्या दूरच्या ठिकाणी जावे लागत असे अशा वेळी अनेक गरिब मुलांना इच्छा असूनही न परवडणाऱ्या महाविद्यालयात जाणे महाकठीण बनले होते.मा.बापूंनी या अचूक गोष्टी जाणून घेऊन सन १९६५ मध्ये इस्लामपूर ते सांगली या रस्त्यावरील आष्टा या गावी आर्टस ,कॉमर्स कॉलेजची सुरुवात केली व पदवीपर्यन्तचे शिक्षण सर्वांना उपलब्ध करुन दिले.[११]

जवाहर विद्यालय,कापूसखेड ( १९६७ )

मा.बापूंनी वाळवे तालुक्यातील कापूसखेड या खेडेगावामध्ये शिक्षणाची सोय उपलब्ध व्हावी या हेतूने जवाहर विद्यालयाची स्थापना केली.पंडित जवाहरलाल नेहरु यांच्या नेतृत्वाचा प्रभाव मा.बापूंच्या जीवनावर पडलेला होता,त्यामुळे त्यांनी या विद्यालयास जवाहर विद्यालय असे नांव देऊन हे विद्यालय चालू केले.[१२]

महाराष्ट्र हायस्कूल,तांबवे ( १९६७ )

कासेगांव पासून ११ किलोमिटर पूर्वेस असणाऱ्या तांबवे या गांवी १९६७ मध्ये मा.बापूंनी तेथील लोकांच्या आग्रहामुळे व त्यांच्या सहकार्यामुळे महाराष्ट्र हायस्कूलची निर्मिती घडवून आणली.[१३]

लालबहादूर शास्त्री विद्यालय,(१९७२ ) (बहे ) --

वाळवा तालुक्यातील बहे या ग्रामीण खेडेगांवामध्ये शिक्षणाचा प्रसार व्हावा ,विद्यार्थ्यांचा उज्ज्वल भावी काल घडविला जावा,यासाठी मा.बापूंनी बहे या गावी लालबहादूर शास्त्री विद्यालय सुरु केले. ते आजही मोठ्या दिमतीने ज्ञानदानाचे कार्य करीत असलेले दिसून येते.[१४]

आभियांत्रिकी महाविद्यालय आणि तंत्रनिकेतन ,साखराळे ( १९८३ ) --

मा.राजारामबापू पाटील यांनी कासेगांव शिक्षण संस्थेद्वारे अनेक खेडे गावामध्ये विद्यालये उघडून ज्ञानाची दारे खुली करण्याचे प्रयत्न केले,त्याचप्रमाणे आष्टा सारख्या भागात कॉलेजचीही स्थापना करुन महाविद्यालयीन शिक्षणाची सोय उपलब्ध करुन दिली. परंतु आधुनिक काळातील तंत्रज्ञानाची ओळख व्हावी सर्वसामान्यांच्या मुलांना तांत्रिक शिक्षण घेता यावे व तांत्रिक शिक्षणापासून वंचित असलेल्या ग्रामीण भागातील मुलांच्यासाठी मा.बापूंनी अभियांत्रिकी महाविद्यालय आणि तंत्रनिकेतनची सोय उपलब्ध करुन दिली. आज हे आभियांत्रिकी महाविद्यालय हे संस्थेतील एक सोनेरी हिरा या नावाने ओळखले जात असल्याचे दिसून येते. या महाविद्यालयातून अनेक राज्यातील मुले शिक्षण घेण्यासाठी येतात.त्यांच्या राहण्याची व जेवनाची सोय उपलब्ध करण्यासाठी एका वसतिगृहाचीही निर्मिती केलेली आहे. या कॉलेजचे प्राचार्य श्री जोगळेकर अतिशय प्रामाणिकपणे कार्य करीत असलेले दिसून येते.[१५]

कासेगांव शिक्षण संस्थेचा विस्तार --

मा.राजारामबापू पाटीलयांनी ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांचा उज्ज्वल भावी काळ सुसंस्कृत करण्यामध्ये मोलाचा वाटा उचलला होता म्हणूनच त्याचे कासेगांव शिक्षण संस्थेतील कार्य महत्वपूर्ण असल्याचे दिसून येते. आज या संस्थेची

तीस हायस्कूल व तीन ज्युनियर,सिनियर महाविद्यालये व एक अभियांत्रिकी महाविद्यालये असल्याचे व या संस्थेचे कार्य अत्यंत सेवाभावी वृत्तीने सुरु असल्याचे दिसून येते.मा.बापूंना मुलांचे जग व शैक्षणिक वातावरण मनापासून आवडत होते.म्हणूनच मा.बापूंनी वाळवा तालुक्यातील अनेक खेडेगावामध्ये शिक्षणासारखे पवित्र कार्य घडवून आणले होते.[१६]

मा.राजारामबापू पाटील यांचे शिक्षण विषयक विचार --

मा.राजारामबापू पाटील शिक्षणविषयक विचार व्यक्त करताना म्हणतात कीआपल्या शिक्षण संस्थातून निर्माण झालेला विद्यार्थी हा स्वत:च्या पायावर त्याला उभा राहता आले पाहिजे.त्यांचा असा विश्वास होता की,माझ्या शिक्षण संस्थातून शिकून बाहेर पडणारा विद्यार्थी हा स्वावलंबी ,स्वाभिमानी तसेच स्वत:वर विश्वास असणारा,गरीबाविषयी प्रेम असणारा,अन्यायाला प्रतिकार करणारा,अभ्यासू असा असेल हे त्यांचे स्वप्न संस्था स्थापन करीत असताना होते. महाराष्ट्रात नव्हे तर देशाचे आशास्थान असणाऱ्या मा.बापूंचे शिक्षणविषयक विचार पाहून त्यांच्या विचारावर चालणाऱ्या बऱ्याच खेडोपाडी संस्था आहेत व त्या संस्था सदोदित त्यांच्या विचाराची धुरा घेऊन आपले कार्य करत आहेत.[१७]

त्यांच्या शिक्षण संस्था खेडोपाडी जरी उभ्या असल्या तरी त्यातून मिळणारे शिक्षण हे उच्च प्रतिचे आहे हे त्यांनी खेड्यातील विद्यार्थी वर्गाला दाखवून दिले आहे. आज कासेगाव शिक्षण संस्थेत हजारो विद्यार्थी शिक्षण घेत आहेत यातून खेड्याचे चित्र बदलत चालले आहे.

माझ्या संस्थेत शिक्षक कसे असावेत हे मा.बापूंनी स्वत: शिक्षक होऊन दाखविलेच परंतु एके ठिकाणी ते म्हणतात 'माझ्या शिक्षण संस्थेतील प्रत्येक शिक्षक हा मनमिळाऊ,ज्ञानी,आणि शिकवत असताना मुलांच्या मनाचा विचार करणारा असावा' हे त्यांचे विचार एखाद्या मानसशास्त्रज्ञासारखे आहेत. हे मानसशास्त्रज्ञाने मान्यच केलेले आहे. ''शिक्षकांने मानवी संस्कृतीचा वारसा हा नवीन पिढीला दिला जावा.इतकेच नव्हे तर आपण निर्माण केलेला सामाजिक वारसा जो आपणाला मिळाला त्याचे पलिकडे जाऊन विद्यार्थ्यांना द्यावा मा.बापूंचे शिक्षणविषयक विचार अतिशय मोलाचे असल्याचे दिसून येतात.

म्हणून एक विचारवंत म्हणतो की राजकीय क्षेत्रातील प्रत्येक नेता हा सामाजिक परिवर्तन करणेसाठी राजकारणात प्रवेश करतो व जेथे परंपरा प्रिय विचारांच्या व्यक्तींना जगाचे दर्शन घडवितो मा.राजारामबापू पाटील यांचे शिक्षणविषयक कार्य वरील ओळीप्रमाणेच महत्वपूर्ण असल्याचे दिसून येते.[१८]

## मा.राजारामबापू पाटील - सहकार क्षेत्रातील कार्य --

मा.श्री.वसंतदादा पाटील व मा.ना.श्री.यशवंतराव चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली राजकीय जीवनाची वाटचाल करीत असताना कै.राजारामबापू पाटील आमदार झाले.मंत्री झाले व एक कार्यकुशल मंत्री म्हणून त्यांनी महाराष्ट्रभर नावलौकिक मिळविला.परंतु मंत्रिपदाची खुर्ची मिळाल्यानंतरही मा.बापूंनी विधायक कार्याची वाटचाल सोडली नाही.सहकार म्हणजे परस्पर सहाय्य,एकमेकास मदत करणे एखादे काम स्वत:पुरते आणि स्वतंत्ररित्या करण्यापेक्षा आपल्या कुटूंबातील आणि नात्यातील तसेच मित्रांच्या सहाय्याने केल्यास ते कार्य जलदगतीने,उत्कृष्ट दर्जाचे व मोठया प्रमाणात होते याची जाणिव मा.बापूंना असल्यामुळेच त्यांनी वाळवा तालुक्यात सहकाराचे जाळेच पसरविले.त्यामध्ये वाळवा सहकारी बॅन्क,वाळवा सहकारी साखर कारखाना,वाळवा सूत गिरणी,वाळवा सहकारी दूध संघ, अशा सहकारी संस्थाची मालिका मा.बापूंनी निर्माण करुन त्याची सत्ता स्वत:कडे ठेवण्याचा संकुचित दृष्टिकोन त्यांनी बाळगला नाही. उलट मा.बापूंनी त्यासाठी वाळवा तालुक्यातील सुशिक्षित तरुण वर्ग हाताशी धरला.त्यांच्यात संघटन निर्माण केले त्यांच्यामध्ये विधायक दृष्टीकोन व सामाजिक कार्याची प्रेरणा निर्माण केली.आणि अशा विधायक वृत्तीच्या तरुणाच्याकडे या संस्था चालविण्याची सूत्रे सोपविली.मा.बापूंच्या संपूर्ण जीवनामध्ये विधायक वृत्तीचे तरुण निर्माण करणे ही सर्वात मोठी व मोलाची कामगिरी केली.[१९]

त्यांच्या सहकार क्षेत्रातील कामगिरी पुढीलप्रमाणे --

### वाळवा सहकारी साखर कारखाना यांची स्थापना ( १० फेब्रु.,१९६९ )

मा.राजारामबापू पाटील यांनी १० फेब्रुवारी १९६९ मध्ये कृष्णा वारणेच्या दुआबात वसलेल्या व कृष्णा वारणेचे पाणी पिऊन विधायक कामाच्यादृष्टीने वाटचाल करणा-या या वाळवा तालुक्यातील सामान्य मानसाच्या

प्रयत्नाला, चिकाटीला व त्यांच्या अस्मितेला पाठींबा देण्यासाठी ऐत्याहासिक पार्श्वभूमी असलेल्या या तालुक्यातील गांवागावातील शक्ती विधायक भावनेने सुसंघटित करुन साखराळे या ठिकाणी वाळवा सहकारी साखर कारखाना याची उभारणी केली.

मा. राजारामबापू पाटील यांनी ५ जुलै १९६८ मध्ये केन्द्र सरकारकडून या कारखान्याबद्दल लेटर ऑफ इंटेंट मिळवून १७ ऑगस्ट १९६८ मध्ये सहकारी नियमाप्रमाणे ही सहकारी संस्था रजिस्टर करण्यात आली.[२०]

वाळवा सहकारी साखर कारखाना उभारणीमध्ये मा. राजारामबापू पाटील यांनी कठोर परिश्रमाने व अमोल मार्गदर्शनामुळेच फार दिवसाचे स्वप्न साकार करु शकले. आपल्या वाळवा तालुक्याचा सर्वंकश विकास करण्यासाठी औद्योगिक प्रगती होणे ही महत्वाची गरज होती म्हणून त्यांनी हा कारखाना उभारला.

कारखान्याचे कार्यक्षेत्र --

वाळवा सहकारी कारखान्यामध्ये प्रामुख्याने वाळवे तालुक्यातील ४८ व तासगांव तालुक्यातील ८ अशी एकूण ५६ गावांना सामील करुन घेतले व या कार्यक्षेत्राची सरकारकडून मान्यता मिळवून घेतली.[२१]

अद्यावत मशिनरी --

मा. राजारामबापू पाटील यांनी १२५० मे. टन गाळप शक्तीच्या साखर कारखान्यास लागणाऱ्या अनेक मशिनरीची माहिती घेऊन भारतामध्ये तयार होणाऱ्या निरनिराळ्या कंपन्याकडून मशिनरीची किंमत, मशिनरीचा दर्जा, इत्यादि बाबतीत तज्ञांशी समक्ष भेटून वाटाघाटी केल्या मा. आ. वसंतरावजी नाईक मुख्यमंत्री महाराष्ट्र राज्य, मा. ना. राजारामबापू पाटील उद्योग व वीज मंत्री महाराष्ट्र राज्य यांच्या सल्ल्यानुसार मेसर्स वालचंदनगर इंडस्ट्रिज लि., वालचंद - नगर या कंपनीशी चर्चा करुन मशिनरी खरेदी संदर्भात दि. ७ जानेवारी १९६९ रोजी मुंबई येथे करार करुन मशिनरी पुरविणारे मे. वालचंदनगर इंडस्ट्रिज लि., वालचंदनगर यांना १,००,००१ रुपये ॲडव्हान्स देण्यात आला.[२२]

कारखान्याच्या कामास प्रत्यक्ष सुरुवात मार्च १९६९ मध्ये करुन ईमारतीचे व मशिनरी फाँडेशन, मशिनरी उमारणीचे काम बहुतांशाने मे १९७० मध्ये पूरे करुन चाचणी गळीत ५ जून १९७० ला घेण्यात आली. म्हणजे हा कारखाना फक्त १४ महिन्यात गळीतास योग्य करुन भारतात नवीन विक्रम केला ही गोष्ट सर्वानाच अभिमानाची आहे या सर्व गोष्टी मा.श्री.राजारामबापू पाटील यांच्यामुळेच शक्य होऊ शकली.[२३]

वाळवा सहकारी साखर कारखाना अवघ्या १४ महिन्यामध्ये पूर्ण झाल्या-नंतर त्या कारखान्याचे चेअरमन पद मोठ्या प्रेमाने मा.श्री.मोहनराव पतंगराव पाटील यांच्याकडे सुपूर्त केले. त्यांच्यावर कारखान्याच्या विकासाची व प्रगतीची जबाबदारी टाकली, पुढे ती त्यांनी चांगल्या रितीने पार पाडल्याचे दिसून येते.[२४]

मा.राजारामबापू पाटील - यांचे वाळवा तालुका सहकारी साखर कारखाना लि., साखराळे, पहिल्या गळीत हंगामाच्या कामाचे शुभारंभ प्रसंगी केलेले भाषण ( १९७० ) ११ नोव्हेंबर ---

मा.राजारामबापू पाटील यांनी सन १९७० मध्ये पहिल्या गळीत हंगामाच्या कामाचे शुभारंभ प्रसंगी बोलत असताना म्हणाले की साधारणत: कोणताही साखर कारखाना उभारण्यास चार वर्ष लागतात, परंतु आपण वाळवा कारखाना दीड वर्षात पूर्ण केला. इतक्या कमी वेळामध्ये उभारलेला सहकारी क्षेत्रातील हा भारतातीलपहिलाच साखर कारखाना होय. हा कारखाना उभारण्याचे कामामध्ये जसा आपण देशात पहिला क्रमांक पटकावला तसाच तो चालविण्याच्या कामामध्येही आपणास अग्रक्रमांक लाभावा अशी हा शुभप्रसंगी त्यांनी इच्छा व्यक्त करुन या कामाचे स्वरुपात या तालुक्याला कृषि-औद्योगिक क्रांतीचा जणू आपण पायाच घालीत आहोत असे मला वाटते. वाळवा तालुक्यातील सर्व शेतकऱ्यांना शेतीबाबत योग्य ते मार्गदर्शन आणि मदत करण्याचे व शेतकऱ्यांची आर्थिक परिस्थिती सुधारण्यामध्ये भरीव कामगिरी करण्याचे आवाहन केले. तसेच या तालुक्यातील बेकारीचा प्रश्न सोडविण्यासाठी हा आपला कारखाना वैशिष्ट्य-पूर्ण उल्लेखनीय कामगिरी करेल अशीही अपेक्षा व्यक्त केली. तसेच कारखान्याच्या

शेजारीच सुमारे एक हजार एकराचे एक आद्योगिक क्षेत्र निर्माण होत आहे ते सर्व नवनिर्मित कारखान्यानी भरुन निघाले तर तालुक्यातील सर्व बेकारांना त्याठिकाणी काम मिळेल.यासाठी आपल्या कारखान्याने एक स्वतंत्र आद्योगिक विभाग उघडावा व एखाद्या तज्ञ व अनुभवी व्यक्तीची नेमणूक करुन या आद्योगिक क्षेत्रात उद्योग काढू इच्छिणाऱ्यांना जरुर ते मार्गदर्शन आणि मदत करावी असे मा.बापूंनी सांगितले. २५

कारखाना उभारणीत समाजवादी दृष्टिकोन --

मा.बापूंनी हा कारखाना ध्येयवादी दृष्टिकोनातून सुरु केला आहे.केवळ काही शेतकऱ्यांना सधन करणे एवढेच आपले ध्येय नाही.शेतीच्या प्रगतीची आणि आद्योगिककरणाची फळे सर्वांनाच चाखावयास मिळणे आवश्यक आहे.उत्पादक व मजूर,मालक व कामगार,शेतकरी व शेतमजूर,बागायत शेतकरी आणि विरायत , शेतकरी,तसेच मोठे अधिकारीआणि कामगार वर्ग,व्यापारी,उद्योगपती आणि शेतकरी यांच्या उत्पन्नामध्ये असणारे फार मोठे अंतर आपणास कमी करावयाचे आहे.त्यासाठी आपण जिरायत शेतकऱ्यांची शेती बागायत करण्याचा आटोकाट प्रयत्न केला पाहिजे.शेतमजूरांना व अगदी थोडी जमीन असणाऱ्या शेतकऱ्यांना, दुग्धदुभत्याचा अगर कुक्कुटपालनासारखा किंवा अन्य एखादा जोडधंदा काढून दिला पाहिजे.शेतमजूरांना आणि कारखान्यातील कामगारांना योग्य आणि पुरेसी मजूरी देणे शक्य होईल अशा पध्दतीने शेती आणि कारखानदारी चालविली पाहिजे.

समाजवादी समाजरचना शांततेच्या आणि लोकशाही मार्गाने भारतात निर्माण करणे हे आपले ध्येय आहे. या ध्येयाप्रत जाण्यासाठी स्वातंत्र्य मिळाल्यापासून आपण पुष्कळ गोष्टी केल्या.किमान वेतन कायदा,मोनोपॉलीज कायदा, बँकांच्या राष्ट्रीयकरणाचा कायदा,कुळकायदा,सावकार नियंत्रण कायदा,कमाल जमिन धारणेचा कायदा इत्यादि कायदे या ध्येयपूर्तीसाठीच शासनाने केले आहेत. गरिबाना सर्व प्रकारचे मोफत शिक्षणाची सोय मुलगामी स्वरुपाची आणि काही महत्वाच्या गोष्टी निर्माण करणारी कारखानदारी सहकारी क्षेत्रात ठेवणे व कच्चा मालाच्या उत्पादकास पक्का माल तयार करण्यास समर्थशाली बनविण्यासाठी शेतकऱ्यांना सहकारी क्षेत्रात कारखानदारी काढण्यास सक्रीय मदत आणि

मार्गदर्शन करणे, जिरायत शेतीचे बागायतीत रुपांतर करणे तसेच आपली शेती आधुनिक पध्दतीने करण्यासाठी शेतकऱ्यांची आर्थिक गरज भागविणे इत्यादि धोरणाविषयक गोष्टी म्हणजे शासनाने त्याच दिशेने उचलेली पावले असल्याचे मा. बापू यांनी सांगितले.[२६]

वाळवा कारखाना महाराष्ट्रात अग्रेसर बनविण्यास प्रोत्साहन --

वाळवा तालुक्याच्या सभोवार महाराष्ट्रातील चार महत्वाचे सहकारी साखर कारखाने आहेत १) शेतकरी सहकारी साखर कारखाना, सांगली २) पंचगंगा सहकारी साखर कारखाना, इचलकरंजी (३) वारणा सहकारी साखर कारखाना, वारणानगर ४) आणि कृष्णा सहकारी साखर कारखाना रेठरे बुद्रुक असे हे चार साखर कारखाने आहेत. हे चार सहकारी साखर कारखाने भारतातील सहकारी साखर कारखान्यांच्या अग्रभागी आहेत. वाळवा सहकारी साखर कारखान्यास या चार साखर कारखान्याचे सहकार्य लाभले आहे. त्यांच्या अनुभवाचा फायदा घेऊन आपला वाळवा कारखाना त्यांच्या तोडीचा करता येणे शक्य आहे. वाळवा तालुक्यातील दर एकरी उसाचे उत्पादन आणि साखरेचा उतारा हा महाराष्ट्रात किंबहुना देशात जास्त आहे म्हणून वाळवा कारखान्यास भारतामध्ये अग्रेसर होणे शक्य आहे. मात्र त्यासाठी जाणिवेच्या प्रयत्नाची आवश्यकता आहे. कमीतकमी कामगारामध्ये कारखाना चालविणे आवश्यक असते. जरुरीपेक्षा जास्त कामगार नेमल्यामुळे कारखान्याचा खर्च वाढत असतो आपण हा कारखाना आदर्श होण्यासाठी सर्व ते उपाय योजावेत अशी सूचना देऊन जेणेकरुन कारखान्याला कमीपणा येईल किंवा कारखान्याच्या कामामध्ये व्यत्यय येईल अशी कोणतीही गोष्ट कोणत्याही सभासदाकडून अगर कामगाराकडून होऊ नये याची काळजी घेण्याची विनंती मा. बापूंनी सभासद, संचालकांना केली.[२७]

आशिया खंडातील सहकारी क्षेत्रातील पहिल्या ॲसिटोन प्रकल्पाची साखराळे ता. वाळवा येथे उभारणी ( १९८३ ) --

मा. राजारामबापूंना सहकार क्षेत्रात विशेष रस होता. वाळवा भाग दुष्काळी असूनही तेथे जबरदस्त सहकारी साखर कारखाना उभा करुन उसाची लागवड

वाढविण्याचा प्रयत्न केला. ऊसाला उतारा कमी मिळत असल्याने साखर कारखाने अडचणीत आले आहेत. ऊसाची शेतीही किफायतशीर होत नाही.तेजी-मंदीचे दुष्टचक्र सुरुच आहे अशा परिस्थितीत साखर कारखान्यांनी बायप्रोडक्टसवर भर द्यावा असे विचार जोम धरीत असतानाच वाळवा सहकारी साखर कारखान्याने आशिया खंडातील पहिला सुसज्ज ॲसिटोन प्रकल्प उभा केला. यामागे मा.बापूंची दुरदुष्टी आणि सहकारी चळवळीच्या वाटचालीची अचूक जाणीव असल्याचे दिसून येते. वाळवा सहकारी साखर कारखाना हे मा.बापूंचे जिवंत स्मारकच आहे. या कारखान्याच्या सहकार्याने त्यांनी सर्वात मोठा ॲसिटोन प्रकल्प उभारला परंतु तो प्रकल्प पूर्ण झालेला पाहण्याचे भाग्य मा.बापूंना लाभले नाही ही दुर्दैवाची गोष्ट आहे. आज हा प्रकल्प कारखान्यास मोठ्या प्रमाणात फायदा मिळवून देत असल्याचे व या प्रकल्पाचे कार्य मोठ्या प्रमाणात चालू असल्याचे दिसून येते.[२८]

वाळवा सहकारी साखर कारखान्याचे नामाकरण —

वाळवा सहकारी साखर कारखाना उभारणी मध्ये मा.बापूंचा वाटा फार मोठा होता.त्यांच्या कार्याची आठवण सतत राहावी यासाठी कारखान्याचे संचालक,व कारखाना सभासद तसेच सामान्य गोरगरिब शेतकरी यांच्या आग्रहामुळे वाळवा सहकारी साखर कारखान्याचे नामाकरण मा.बापूंच्या मृत्युनंतर (१९८५) श्री राजारामबापू सहकारी साखर कारखाना लि.,साखराळे ,जि:सांगली असे करण्यात आले. हा कारखाना मा.बापूंचे चिरंजीव आमदार श्री जयंत पाटील यांच्या नेतृत्वाखाली प्रगतीकडे वाटचाल करीत असल्याचे व या कारखान्यामार्फत अनेक प्रयोग यशस्वी होत असलेले दिसून येते. या कारखान्याने देशातील एक अग्रेसर कारखाना म्हणून नावलौकिक मिळविला आहे.

श्री महंकाली सहकारी साखर कारखाना यांची कवठेमहंकाल येथे स्थापना
( १९८३ )

महाराष्ट्रातील कायम अवर्षणग्रस्त अशा ८७ तालुक्यांना पाणी पुरवठ्यात प्राधान्य मिळाले पाहिजे. दुष्काळी भागाला पाणी देण्यासाठी तो खर्च केला पाहिजे.दुष्काळामुळे होरपळत असलेल्या जनतेचे उध्वस्त जीवन सावरण्यासाठी दुष्काळी निर्मूलनाच्या दीर्घकालीन उपाय योजले पाहिजेत.सांगली जिल्ह्याचा पूर्वभाग

समृध्द करावा असे मा.बापूंना वाटत होते.सांगली जिल्हातील कवठेमहंकाल व जत या दोन तालुक्यामध्ये विधायक कामे उभारण्याच्यादृष्टीने मा.बापूंनी लक्ष घातले होते. सहकारांच्या माध्यमातून सामाजिक,आर्थिक व शैक्षणिक प्रगतो साधण्याच्या हेतूने सांगली जिल्हातील दुष्काळी व आद्योगिकदृष्टया अविकसित भागात सहकारी साखर कारखान्याची उभारणी करण्याचे ध्येय मा.बापूंनी ठरविले होते.त्या ध्येयाची पूर्तता करण्यात यशस्वी ठरलेला महान प्रयोग म्हणजे श्री महंकाली सहकारी साखर कारखाना लि.,कवठेमहंकाल,जि:सांगली होय. आज या कारखाना परिसरात राजारामबापू नगर असे नांव देण्यात आलेले असून या कारखान्याचे चेअरमन मा.श्री.आप्पासाहेब गणपती सगरे यांच्या नेतृत्वाखाली कारखान्याची प्रगती सुरु आहे.[२९]

वाळवा तालुका कृषि पदवीधर कृषीउद्योग विकास सहकारी संघ लि., इस्लामपूर (३०-६-१९७८ ) ची स्थापना --

मा.राजारामबापू पाटील यांनी शेतकऱ्यांना योग्य दरामध्ये रासायनिक खत पुरवठा,उत्तम प्रतिचे बी-बियाणे,किटकनाशके,शेती उपयोगी अवजारांचा पुरवठा ,तसेच शेतीविषयक शेतकऱ्यांना मोफत सल्ला आणि मोफत माती परिक्षण इत्यादि सुविधा उपलब्ध करुन देण्यासाठी दि.३०-६-१९७८ मध्ये इस्लामपूर ता.वाळवा या ठिकाणी वाळवा तालुका कृषि पदवीधर संघाची स्थापना केलेली होती. या संघाचे कार्य आजही उत्कृष्टपणे चालल्याचे दिसून येते.[30]

वाळवा तालुका सहकारी दूध उत्पादक व पुरवठा संघ मर्यादित-इस्लामपूर ची स्थापना ( ३०-१२-१९७५ ) --

वाळवा तालुक्याचा सर्वांगीन विकास घडवून आणण्यासाठी मा.श्री. राजारामबापू पाटील यांनी विधायक कार्याची एक वेगळी परंपरा या तालुक्यात निर्माण केली होती.यासाठी वाळवे तालुक्यातील दुधाला योग्य भाव मिळवून देण्यासाठी ,दुधाला संरक्षण देण्यासाठी,व बाजारपेठ मिळवून देण्यासाठी दि.३०-१२-१९७५ मध्ये इस्लामपूर येथे वाळवा तालुका सहकारी दूध उत्पादक व पुरवठा संघाची निर्मिती केली.या संघातर्फे ` वाळवा` पशु आहार` हे एक महत्वाचे पशू खाद्य वाळवा तालुक्यामध्ये पाठविले जाते.आज हा दूध संघ

मा.श्री.नानासो फल्तरे व मा.श्री.पां.वि.जगताप यांच्या नेतृत्वाखाली प्रगतीकडे वाटचाल करीत असल्याचे दिसून येते.[३१]

शेतकरी विणकरी सहकारी सूत गिरणी लि.,इस्लामपूर ची स्थापना ( १९७९ ) --

मा.श्री.राजारामबापू पाटील यांनी वाळवा तालुक्यातील बेकारीचा प्रश्न सोडविण्यासाठी व लघु उद्योगांना प्रोत्साहित करण्यासाठी,शेतकऱ्यांच्या मालाचा उपयोग योग्य पध्दतीने करण्यासाठी इस्लामपूर येथे शेतकरी विणकरी सहकारी सूत गिरणीची स्थापना १-१२-१९७९ मध्ये केली.या गिरणीमुळे वाळवा तालुक्यातील तरुणांना कामे मिळालीत. आज या गिरणीचे कार्य व्यवस्थीतपणे चालू असल्याचे दिसून येते.[३२]

वाळवा तालुका मध्यवर्ती सहकारी होलसेल ग्राहक भांडार मर्यादित, इस्लामपूर येथे स्थापना --

मा.बापूंनी वाळवा तालुक्यामध्ये लहान-मोठया संस्था उभ्या करीत असताना तालुक्याच्या सर्वांगीण विकासाचा आराखडा सतत त्यांच्या नजरपुढे असे. वाळवा तालुक्यातील सर्वसामान्य लोकांना कमी किंमतीमध्ये उत्कृष्ट दर्जाचा माल मिळावा व तो दर्जेदार माल टिकाऊ असावा तसेच दिर्घकाळ टिकणाऱ्या अनेक वस्तुचा संग्रह करुन मा.बापूंनी वाळवा तालुका मध्यवर्ती सहकारी होलसेल ग्राहक भांडाराची स्थापना इस्लामपूर येथे केली.या ग्राहक भांडाराचे काम समाधानकारक असल्याचे दिसून येते.[३३]

वाळवा सहकारी बँन्क लि.,पेठ ची स्थापना ( १९९१ )--

वाळवा तालुक्याच्या सर्वांगीण विकासासाठी या तालुक्याचे भाग्यविधाते मा.राजारामबापू पाटील यांनी वाळवा सहकारी बँन्केची स्थापना पेठ या ठिकाणी इ.स.१९८१ मध्ये केली.या तालुक्याच्या विकासामध्ये भर घालण्याच्या- उद्देशाने व तालुक्यातील आर्थिकदृष्टया दुर्बल,अल्पभूधारक शेतकरी,कारागीर, सुशिक्षित व अर्धशिक्षित बेकार यांच्या आर्थिक उन्नतीसाठी तसेच त्यांनी स्वाभिमानाने जीवन जगता यावे या उद्देशाने या बँन्केची स्थापना केली होती.

या बॅन्केचे १५ संचालक असून या बॅन्केचे चेअरमन मा.श्री.दत्ताजीराव गणपतराव पाटील आहेत. राजारामबापू पाटील यांनी सांगली जिल्ह्यातील सर्वसामान्य जनतेला,दुर्बल आणि कमकुवत घटकांना अर्थ सहाय्य करुन त्याचे संसार उभे करण्याच्या उद्देशाने,तसेच छोटे छोटे शेतकरी,शेतमजूर,कामगार,छोटे मोठे उद्योजक यांना अर्थ सहाय्य करण्याच्या उद्देशाने या बॅन्केची स्थापना केली होती.बॅन्केच्या स्थापनेपासून मा.श्री.बापूंनी कार्यक्षम विधायक प्रवृत्तीचे व व्यापारी दृष्टिकोन असलेल्या व्यक्तींचीसंचालक मंडळावर नियुक्ती केली. वाळवा बॅन्क स्थापन झाल्या-नंतर सुरुवातीच्या काळात बॅन्केच्या संचालकांनी कोणत्याही प्रकारचे भत्ते व मानधन न घेता संचालक म्हणून कार्य केले.त्याच बरोबरच आपली बॅन्क मक्कम पायावर उभी राहावी व बॅन्केला स्वत:ची ईमारत असावी म्हणून बॅन्केच्या सभासदांनी देखिल लाभांश न घेता तो लाभांश ईमारत निधीमध्ये गुंतविला, त्यामुळेच आज पुणे बेंगलोर महामार्गावर पेठ येथे बॅन्केने सर्व सोईनी युक्त अशी इमारत बांधलेली आहे.[३४]

## वाळवा बॅन्केचे भागभांडवल व शाखा विस्तार --

मा.राजारामबापू पाटील यांनी १९८१ मध्ये अवघ्या पाचलाख रुपये भांडवलावर स्थापना केलेल्या या सहकारी बॅन्केचे खेळते भांडवल आज रोजी १६ कोटी चौदा लाख रुपये झाले असून,बारा कोटी वीस लाख रुपयाच्या ठेवी आहेत.या बॅन्केने डिसेंबर १९८२ अखेर आकरा कोटी पन्नास लाख रुपयाचे कर्ज वाटप केले असून डिसेंबर १९९२ अखेरच्या ९ महिन्यात २७ लाख रुपयाचा नफा मिळविलेला आहे. या बॅन्केच्या पेठ,इस्लामपूर,राजारामनगर व बावची या ठिकाणी शाखा कार्यरत असून पाचवी शाखा सांगली येथे १७-१-१९९३ मध्ये महाराष्ट्राचे अर्थमंत्री मा.ना.श्री.रामराव आदिक यांच्या हस्ते सुरु करण्यात आली. वाळवा बॅन्केचे प्रधान कार्यालय पेठ ता.वाळवा येथे आहे.[३५]

## वाळवा बॅन्केत संगणकाचा वापर --

बॅन्केच्या ग्राहकांना व खातेदारांना जलद व कार्यक्षम सेवा उपलब्ध व्हावी म्हणून सन १९९२ पासून या बॅन्केमध्ये संगणकाचा वापर केला जात आहे.

## वाळवा बँन्केचे राजारामबापू सहकारी बँन्क लि.,पेठ येथे नामाकरण -- ( १९८५ )

मा.बापूंच्या निधनानंतर त्यांच्या कार्याची आठवण तेवत ठेवण्यासाठी वाळवा सहकारी बँन्केचे राजारामबापू सहकारी बँन्क लि.,पेठ असे नामकरण करण्यात आले आहे. या बँन्केचे चेअरमन श्री डी.जी.पाटील यांच्या नेतृत्वाखाली ही बँन्क प्रगतीकडे वाटचाल करीत असून या बँन्केमार्फत सामाजिक ,शैक्षणिक व सांस्कृतिक कार्यांसाठी धर्मादाय निधीतून आर्थिक मदत करीत असल्याचे दिसून येते.[३६]

अशा प्रकारे शिक्षण व सहकार चळवळीतून मा.बापूंचे व्यक्तिमत्व फुलत गेले.मा.बापूंनी सहकारी क्षेत्रात पाऊल टाकले आणि सामान्य शेतकऱ्याला त्यांनी कारखानदार बनविले.शिक्षण क्षेत्रात त्यांनी पाऊल टाकले आणि गरीब शेतकरी,शेतमजूर यांच्या लेकी-सूना-मुलींना पदवीधर केल्या. सामाजिक व शैक्षणिक कार्याद्वारे जनसामान्यांची सेवा करावयाची हे त्याचे ध्येय होते. मा.बापूंचे सरकार सहकार-शिक्षण-व्यापार-कारखानदारी या विकासांच्या पंचप्राणांनी कार्य पुनीत झालेले आहे.राजकीय,शैक्षणिक वा सहकारी क्षेत्रातील कोणतेही काम असो अहोरात्र परिश्रम घेण्याची मा.बापूंची तयारी असायची , त्यामुळेच मा.बापू शिक्षण वसहकार क्षेत्रात भरीव स्वरुपाची कार्य करु शकले, त्यांच्या या कार्यामुळे आज वाळवा तालुका सुजलाम सुफलाम बनलेला आहे.त्यामुळे मा.बापूंचे सहकार व शिक्षण क्षेत्रातील कार्याला अनन्यसाधारण महत्व आहे.[३७]

संदर्भ


| | | |
|---|---|---|
| १ | पाटील लालासाहेब कृ. (उरुण इस्लामपूर ) | - मुलाखत, वय ५०, दि.३०-१०-१९९३. |
| २ | प्रा. मगुंडकर मा.प. (पुणे ) | - राजारामबापू पाटील महाराष्ट्राला मिळालेला वारसा, लेख - दि.१७ जाने., १९८६, पृ.२८. राजारामबापू पाटील प्रबोधिनी-इस्लामपूर, संपा. पाटील शामराव . |
| ३ | श्री पुजारी बा.मा. (सांगली) | - वाळवे तालुक्याला नवी मनुस्मृती देणारा नेता, लेख दि.१७ जाने., १९८५, मा. राजारामबापू पाटील स्मरणिका चैतन्य स्मरण - इस्लामपूर, संपा. पाटील शामराव. |
| ४ | पाटील बा.ल. | - लहकपात्र, पुणे (१९७०), पृ.२१. |
| ५ | दै. प्रतिध्वनी (सांगली) | - सांगली दि.१७-१-८५, लेख - एक धगधगता जीवनपट: राजारामबापू पाटील, पृ.३. |
| ६ | श्री आत्तार सी.जी. माजी मुख्याध्यापक, आझाद विद्यालय, कासेगांव. | - मुलाखत, दि.३०-९-९३, वय - ६२. |
| ७ | कित्ता | - -,,-- |
| ८ | दै. अग्रदूत (सांगली) | - लेख - कर्तृत्वाचा आदर्श : मा. राजारामबापू दि.१७-१-८६, पृ.३३. |
| ९ | दै. राष्ट्रशक्ती (सांगली) | - दि.१७-१-८९, पृ.४. |
| १० | दै. अग्रदूत (सांगली) | - लेख - कै. राजारामबापू सच्चा कार्यकर्ता, पृ.२, दि.१७-१-१९८५. |
| ११ | श्री माने आप्पासाहेब माजी मुख्याध्यापक, आझाद विद्यालय, कासेगांव | - मुलाखत, दि.३०-११-१९९३, वय-६३. |

| | | | |
|---|---|---|---|
| १२ | श्री माने आप्पासाहेब<br>माजी मुख्याध्यापक,<br>आझाद विद्यालय,कासेगांव. | - | मुलाखत,दि.३०-११-१९९३,वय.६३. |
| १३ | पाटील बा.ल. | - | सह्कपात्र(पुणे)(१९७०),पृ.२३. |
| १४ | श्री पत्की व्यंकाप्पा,सांगली | | अश्वत्थवृक्षा,लेख - दि.१७ जाने.,१९८५,<br>मा.राजारामबापू पाटील स्मरणिका चैतन्य<br>स्मरण(इस्लामपूर),संपा.पाटील शामराव |
| १५ | दै.अग्रदूत,सांगली | - | कै.राजारामबापू पाटील - शिक्षाण प्रेमी,<br>दि.१७-१-८९,पृ.२. |
| १६ | कित्ता | - | -,,- |
| १७ | श्री आत्तार सी.जी.<br>माजी मुख्याध्यापक,<br>आझाद विद्यालय,कासेगांव. | - | मुलाखत,दि.३०-९-९३,वय ६२. |
| १८ | श्री पुजारी बा.मा.,सांगली | | वाळवे तालुक्याला नवी मनुस्मृती देणारा नेता,<br>दि.१७ जाने.,१९८५,पृ.२९,<br>मा.राजारामबापू पाटील स्मरणिका -<br>इस्लामपूर,संपा.पाटील शामराव. |
| १९ | वाळवा तालुका सहकारी साखर कारखाना लि.साखराळे,ता.वाळवा,दुसरा | | वार्षिक अहवाल,१९६९-७०. पृ.२. |
| २० | - कित्ता - | | --,,-- पहिला वार्षिक अहवाल,<br>दि.३० जून १९६९ अखेर,पृ.४. |
| २१ | - कित्ता -- | | --,,-- दुसरा वार्षिक अहवाल,सन १९६९-७०,<br>पृ.३. |
| २२ | - कित्ता -- | | --,,-- सन १९६९-७०, पृ.३ |
| २३ | - कित्ता -- | | --,,-- दुसरा वार्षिक अहवाल,सन १९६९-७०,<br>पृ.४. |
| २४ | मा.पाटील राजारामबापू - यांचे वाळवा तालुका सहकारी साखर कारखाना | | इस्लामपूर - पहिल्या गळीत हंगामाच्या कामाचे प्रसंगी<br>केलेले भाषण - दि,११ नोव्हें.,१९७०,पृ.१. |

२५ मा.पाटील राजारामबापू : यांचे वाळवा तालुका सहकारी साखर कारखाना इस्लामपूर - पहिल्या गळीत हंगामाच्या कामाचे प्रसंगी केलेले भाषण - दि.११ नोव्हेंबर,१९७०, पृ.२.

२६ - कित्ता -- --,,-- पृ.५.

२७ दै.सागर(चिपळूण) - जाणता संघटक हरवला, लेख दि.१७-१-१९८६,पृ.३२ विशेष स्मरण,(सांगली),संपादक वसंत - विष्णू पाटील.

२८ श्री पुजारी बा.मा. (सांगली) - विधायक कार्याला वाहून घेतलेल्या कर्तृत्वसंपन्न व्यक्तिमत्वाची अखेर , लेख दि.१७-१-१९८६,पृ.८८, विशेष स्मरण (सांगली), संपा.वसंत विष्णू पाटील.

२९ मा.पाटील शामराव - चैतन्यस्मरण इस्लामपूर(१९८५) पृ.३३.

३० पाटील शंकर खंडू कोल्हापूर. - माणुसकीने रसरसलेले सागरफूल, दि.१७ जाने.,१९८५,पृ.३१, राजारामबापू पाटील स्मरणिका-इस्लामपूर, संपा. पाटील शामराव

३१ प्रा.पाटील लालासाहेब कृ उरुण इस्लामपूर. मुलाखत,वय ५०,दि.३०-१०-१९९३.

३२ श्री पुजारी बा.मा. सांगली - विधायक कार्याला वाहून घेतलेल्या कर्तृत्वसंपन्न व्यक्तिमत्वाची अखेर,दि.१७-१-१९८६,पृ.८९. विशेष स्मरण(सांगली), संपा. वसंत विष्णू पाटील.

३३ वाळवा सहकारीबॅन्क लि.,पेठ ,ता.वाळवा,जि:सांगली तिसरा वार्षिक अहवाल - १९८२-८३,पृ.२.

३४ -- कित्ता --- --,,---- पृ.३.

३५ दै.अग्रदूत,सांगली - अंक .दि.१७-१-१९८३, पृ.२.

३६ श्री नाईक अरुण - अनतात विलीन, दि.१७-१-१९८६, पृ.७७,
विशेष स्मरण - संपादक वसंत विष्णू --
पाटील,(सांगली)

३७ - कित्ता -- --,,-- पृ.७७.